# आषाढी एकादशीनिमित्त विठ्ठल मंदिरात सायबर सुरक्षिततेचा जागरूकता महोत्सव

अकोला, (विदर्भ मतदार प्रतिनिधी) :

आषाढी एकादशीनिमित्त दिनांक ६ जुलै २०२५ रोजी विठ्ठल मंदिर, अकोला येथे एक आगळावेगळा व समाजहिताचा 'सायबर सुरक्षितता जनजागृती उपक्रम' मोठ्या उत्साहात पार पडला.

या उपक्रमाचे आयोजन शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय, अकोला यांच्या वतीने करण्यात आले असून, क्विक हिल फाउंडेशन, पुणे आणि महाराष्ट्र सायबर सेल, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला.या उपक्रमाचा मुख्य उद्देश डिजिटल युगात वाढत्या





सायबर गुन्ह्यांपासून नागरिकांना जागरूक करणे, सुरक्षित ऑनलाइन वर्तनाचे महत्व पटवून देणे, तसेच सायबर हायजीनची सवय लावणे असा होता.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जगदीश साबू यांच्या मार्गदर्शनाने आणि सायबर क्लब कोऑर्डिनेटर डॉ. दीप्ती पेठकर यांच्या सक्रिय पुढाकारातून हा उपक्रम अत्यंत यशस्वीपणे पार पडला.विशेष म्हणजे, जुने शहर पोलीस स्टेशन, अकोला येथील पोलीस अधिकारी, सायबर तज्ञ आणि वरिष्ठ मार्गदर्शक देखील उपस्थित होते. त्यांनी प्रत्यक्ष भाविकांशी संवाद साधत सायबर गुन्हे टाळण्यासाठी खालील विषयांवर सोप्या भाषेत मार्गदर्शन केले ऑनलाइन फसवणूक ओळखण्याचे व टाळण्याचे मार्गसोशल मीडियावर सुरक्षित वर्तनाची गरज , सायबर हायजीनचे नियम आणि त्याचे फायदे, बँक व्यवहार करताना घ्यावी ती काळजी घेण्यासाठी लोकांना जागृत करण्यासाठी कार्यक्रमात सायबर क्लब सदस्य व विद्यार्थ्यांनी चांगलीच चमक दाखवली. त्यांनी पोस्टर प्रदर्शने, स्लोगन बोर्ड, फ्लॅश कार्ड्स, तसेच थेट संवाद आणि प्रश्नोत्तर सत्रांद्वारे सायबर सुरक्षिततेविषयी माहिती दिली.नागरिकांनीही मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला आणि सायबर सुरक्षेसंदर्भातील प्रश्न विचारून सजग नागरिकत्वाचे दर्शन घडवले.

सायबर क्लब सदस्य रोहन सर्जे का, प्रणाली पिंपळकर, पूर्वा ताथे, अनिकेत फुके तसेच इतर विद्यार्थी सहभागी निशा गाहेरकर, हर्षा भिहाडे, साक्षी फाटक, आदित्य गोतमारे, भाविक भुडके, ओम गुजर, नारायण चेपने, तनुजा घोगरे, सिया अग्रवाल, श्रेया इंगळे या सर्व विद्यार्थ्यांनी भाविकांशी संवाद साधत सायबर गुन्ह्यांचे स्वरूप, त्याचे परिणाम आणि ते टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी यावर प्रभावी माहिती दिली.

कार्यक्रमाच्या शेवटी क्विक हिल फाउंडेशन, पुणे तर्फे पोलीस प्रशासन, महाविद्यालयीन व्यवस्थापन आणि सहभागी विद्यार्थ्यांचे मन:पूर्वक आभार मानण्यात आले.त्यांनी भविष्यातही अशीच सायबर सुरक्षा जनजागृती शाळा, महाविद्यालये, मंदिरे आणि सार्वजनिक ठिकाणी राबवण्याचा संकल्प व्यक्त केला, जेणेकरून डिजिटल इंडिया अधिक सुरक्षित व जागरूक बनेल.